N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** सिडको

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0339 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/06/2025 20:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 17/06/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/06/2025

**Time From (वेळेपासून):** 13:03 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:03 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/06/2025 **Time (वेळ):** 20:41 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 045

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/06/2025 20:41 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सिडको कार्यालय येथील,मोकळ्या परिसरात,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विनय सतिश देशमुख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2004

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वडगाव कोल्हाटी,गंगोत्री पार्क प्लट नं 150,छत्रपती संभाजीनगर,सिडको , छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वडगाव कोल्हाटी,गंगोत्री पार्क प्लट नं 150,छत्रपती संभाजीनगर,सिडको , छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7498599629

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिलीप रामराव ढाले | | | 1. एन-6,5/6 संभाजी कलनी, छत्रपती संभाजीनगर,सिडको , छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी विनय सतिश देशमुख, वय 21 वर्ष, व्यवसाय शिक्षण राहणार वडगाव कोल्हाटी, गंगोत्री पार्क प्लॉट नं. 150 ता. जि. छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 7498599629.
मी आज दिनांक 17/06/2025 रोजी श्री. चैनसिंग गुसिंगे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माझी एका लोकसेवका विरुध्द पैसे मागत असले बाबत तक्रार असल्याचे सांगितले असता त्यांनी त्यांचेकडील पोलिस अंमलदार नंदिले यांना दोन पंच आणणेकरीता पत्र देवून पंच आलेवर पंचांची व माझी ओंळख करून दिली व पंचासमक्ष मला तक्रारीबाबत विचारणा केली असता मी स्वहस्ताक्षरात तक्रार लिहून दिली की, " मी विनय सतिश देशमुख, वय 21 वर्ष, व्यवसाय शिक्षण राहणार वडगाव कोल्हाटी, गंगोत्री पार्क प्लॉट नं. 150 ता.जि. छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 7498599629.मी वरिल प्रमाणे असुन माझे वडील सतिश दौलतराव देशमुख व माझ्या वडिलांचे पाटनर श्री. विठ्ठल बळिराम धोडपकर यांनी 2019 मध्ये तिसगाव सिडको वाळुंज महानगर 1 ता.जि. छत्रपती संभाजीनगर येथील सिडको पर्यायी जमीन क्षेत्र हद्दीतील गट नं. 140 मधील JKL सिटी मधील विक्री निवासी भुखंड क्र. 29 ज्याचे क्षेत्र 65.78 चौ.मी असुन सदर भुखंड माझे वडिल श्री. सतिश दौलतराव देशमुख व वडिलांचे पाटनर विठ्ठल बळीराम धोडपकर यांच्या नावे असुन रजिस्ट्री क्र. 7026/2019 अन्वये खरेदी खत केलेले आहे. माझे वडिल श्री. सतिश देशमुख हे मराठवाडा ऍटो कॉपो लिमिटेड वाळुंज येथे ड्युटीला असल्यामुळे आमचे वर नमुद भुखंडाचे सिडको येथील कार्यालयातील कामकाज मी पाहत असतो. दिनांक 12/06/2025 रोजी आमचे वर नमुद भुखंडाची सिडको येथे नोंदणी करण्यासाठी मी व माझ्या वडिलांचे पार्टनर श्री. विठ्ठलराव धोडपकर यांनी सिडको येथे कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे वर नमुद भुखंडाचे नोंदणी करण्याबाबत अर्ज दिला होता. सिडको कार्यालयात आमचे भुखंड नोंदणीचे काम श्री. दिलीप ढाले यांच्या कडे असल्याचे आम्हाला समजल्याने आम्ही श्री. दिलीप ढाले यांच्या कडे गेलो असता कार्यालयात आम्हाला श्री. दिलीप ढाले साहेब भेटले व त्यांनी मला तुमच्या भुखंडाचे सिडकोला नोंदणी करण्यासाठी मला 1000/- रुपये द्यावे लागतिल असे सांगितल्याने मी सदर प्रकार माझ्या वडिलांना सांगितले होते त्यानंतर माझे वडील व त्यांचे पाटनर यांची चर्चा झाल्यानंतर मला आमच्या भुखंडाची नोंदणी करिता शासकीय फिस व्यतिरिक्त लाच देण्याची ईच्छा नाही म्हणुन मी माझे वडिल व त्यांचे पार्टनर श्री. धोडपकर यांच्या सांगण्याप्रमाणे माझ्या कामासाठी मी श्री. ढाले साहेब यांना भेटण्यासाठी जाणार आहे त्यांनी मला आमच्या सिडको भुखंडाचे नाव नोंदणी साठी लाचेची मागणी केल्यास त्यांच्या वर कायदेशीर कारवाई करावी माझा आणि श्री. ढाले साहेब यांचा कोणताही उसनवारीचा व्यवहार नाही तसेच वैर दुश्मणी नाही. आज रोजी मी खरेदी दस्त क्र. 7026/2019 व दिनांक 12/06/2025 रोजी दिलेला अर्ज याची सत्यप्रत झेरॉक्स हजर करत आहे. " वगैरे मजकुराची तक्रार दिली. माझे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 17/06/2025 रोजी सिडको कार्यालयातील भुखंड नोंदणीचे काम करणारे श्री. दिलीप ढाले हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व पंच क्रमांक 1 श्री. चंदनशिवे यांना सिडको येथील भुखंड नोंदणी कार्यालयात श्री. दिलीप ढाले यांच्याकडे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले पोनि/गुसिंगे यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर मी माझे मोटारसायकलने व दोन्ही पंच, पोनि/गुसिंगे, पोअं/नंदिले, पोअं/हिवाळे, असे कॅनॉट परीसरात सुरक्षित ठिकाणी जावून थांबलो. पोनि/गुसिंगे यांचे सुचनेवरुन पोशि/हिवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 श्री. लकी चंदनशिवे यांना सिडको येथील भुखंड नोंदणी कार्यालयात श्री. दिलीप ढाले यांचेकडे माझेकडील मोटारसायकल क्र. MH 20-GU-4673 ने 11.45 वाजता पाठवले. मी व पंच क्रमांक -1 श्री. लकी चंदनशिव असे सिडको येथील भुखंड नोंदणी कार्यालयात गेलो त्याठिकाणी माझी व श्री. दिलीप ढाले यांची भेट झाली भेटी दरम्यान माझे वडिलांचे व त्यांचे पार्टनर यांचे सिडको येथील भुखंड नोंदणी बाबत चर्चा झाली

त्यानंतर त्यांनी मला सेंट्रल बँक येथे भरण्यासाठी चलन पावती दिली त्यानंतर त्यांनी माझी अर्जावर चलन दिले बाबत सही घेतली व त्यानंतर त्यांनी मला त्यांचे कार्यालयाचे बाहेर घेवुन जमल काही अनल काही माझ असे विचारले तेव्ही मी त्यांना सोबत ए.टी.एम. कार्ड आणले आहे किती विचारले असता त्यांनी मला तुला सांगितल ना दहा दहा वेळेस विचारत जाऊ नको म्हणुन चांगल वाटत नाही, ऑफिस आहे हे जा घेवुन ये असे म्हणाले व मला म्हणाले की, तुला त्या दिवशी ही सांगितल परत परत एकच शब्द असे म्हणुन मला बर जाय तुला काय अनायच आन जा असे म्हणुन पैसे घेवुन येण्यास सांगितले. मी व पंच श्री लकी चंदनशिवे असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 11.54 वा. परत आलोत तेथे आल्यानंतर पोनि/गुसिंगे यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/गुसिंगे, मी, पंच व सापळा पथकतील सदस्याने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, श्री. दिलीप ढाले यांनी मला एटीएम मधुन पैसे घेवुन ये असे बोलल्याचे मान्य केले परंतु सदर लाचमागणी ही रोख स्वरुपात स्पष्ट नसल्याने पोनि/गुसिंगे यांनी पुन्हा लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले व पोनि/गुसिंगे यांचे सुचनेवरुन पोशि/हिवाळे यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या गळ्यात सुरक्षित अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 श्री. लकी चंदनशिवे यांना सिडको येथील भुखंड नोंदणी कार्यालयात 12.10 वा. श्री. दिलीप ढाले यांचेकडे पाठविले असता मी सिडको येथील कार्यालयात श्री. दिलीप ढाले यांची परत भेट घेतली व त्यांनी मला दिलेली चलन पावती यावर शिक्का लागत का असे बोललो त्यावेळी त्यांनी मला कामासंदर्भात चर्चा केली. त्यावेळी श्री दिलीप ढाले यांनी मला हजार रुपये घेवुन ये,काही चिंता नाही जरा शांततेत ये पटकन ये बाजुला बँक आहे असे सांगुन 1000/- लाचेची मागणी केल्याचे मान्य केले. मी व पंच श्री लकी चंदनशिवे असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 12.17 वा. परत आलोत तेथे आल्यानंतर पोनि/गुसिंगे यांचे सुचनेवरुन पोशि/ हिवाळे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/गुसिंगे, मी, पंच व सापळा पथकतील सदस्याने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, श्री. दिलीप ढाले यांनी मला एटीएम मधुन 1000/- रुपये पैसे घेवुन ये असे बोलल्याचे मान्य केले.त्यानुसार पोनि/गुसिंगे यांनी मला व दोन्ही पंचांना श्री. दिलीप ढाले यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले.पोनि/गुसिंगे यांनी वेळेअभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/गुसिंगे यांनी सापळा कारवाईसाठी ऍ◌थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. पोनि/गुसिंगे यांनी माझेकडुन सापळा करवाईसाठी लागणारे 1000/-रु ज्यामध्ये 500/-रु दराच्या 02 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक-2 श्री. तुळशीराम गुंजाळे यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास पोअं/नंदिले यांनी ऍ◌थ्रासिन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पँटचे◌े समोरील उजवे◌े बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/गुसिंगे यांनी मला श्री. दिलीप ढाले यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाच रकमेच्या नोटा 1000/-रु. काढुन श्री. दिलीप ढाले यांना द्याव्यात व त्यानंतर शर्टचे हाताचे बाह्या खाली कराव्यात असा इशारा नेमुन दिला.

त्यानंतर पोनि/गुसिंगे यांचे सुचनेवरुन पोशि/हिवाळे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे गळ्यात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक-1 श्री. लकी चंदनशिवे यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 1000/-रु. लाच रक्कम श्री.दिलीप ढाले यांना देण्यासाठी 12.58 वाजता सिडको येथे रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि/गुसिंगे, पोअं/ नंदिले, पोअं. हिवाळे, पंच क्र. 2 श्री तुळशीराम गुंजाळे असे सापळा पथकासह येत होते. मी व पंच क्रमांक 1 सिडको येथील नोंदणी कार्यालयात गेलो तेथे श्री. दिलीप ढाले हे बसलेले होते. मी व पंच क्र.1 असे त्यांचेजवळ गेलो. त्यानंतर श्री. दिलीप ढाले यांनी मला कार्यालयाचे खाली मोकळ्या परिसरात घेवुन गेले तेथे मी त्यांना मी माझे पँटचे खिशातून लाच रक्कम काढून श्री. दिलीप ढाले यांचेसमोर धरली असता त्यांनी ती डावे हाताने स्विकारून दोन्ही हातांनी मोजून त्यांचे पँटचे डावे बाजूचे खिशात ठेवली. त्यानंतर लाच स्विकारल्यावर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 13.03 वा. केला. इशारा प्राप्त होताच पोनि/गुसिंगे, पो.अंम./हिवाळे, पोअं/नदिले व पंच क्रमांक 2 श्री. तुळशीराम गुंजाळे हे तात्काळ घटनास्थळावर हजर आले. पोशि/ हिवाळे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/गुसिंगे यांनी श्री. दिलीप ढाले यांना ताब्यात घेवून त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/गुसिंगे यांनी पंच क्रमांक-1 श्री. लकी चंदनशिवे यांना पंच क्रमांक 2 श्री. गुंजाळे यांचे समक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्रमांक -1 श्री. चंदनशिवे यांनी सांगितले की, " श्री. दिलीप ढाले यांनी हजार रूपये लाचेची मागणी करुन 1000/-रु. लाच रक्कम डावे हाताने स्विकारुन मोजून स्वत: चे अंगावरील पँटचे डावे बाजुचे खिशात ठेवली आहे. " असा खुलासा पंच क्रमांक 1 श्री. चंदनशिवे यांनी केला. पोनि/गुसिंगे यांनी श्री. दिलीप ढाले यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव दिलीप रामराव ढाले वय 52

वर्षे, व्यवसाय एस.जी.सिडको कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, रा. एन-6,5/6 संभाजी कॉलनी, छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले. पोनि/गुर्सिंगे यांनी श्री. ढाले यांना 1000/-रु. लाच रकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी अंगावरील पँटचे खिशात ठेवली आहे असे सांगितले. पोनि/गुर्सिंगे यांनी सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 श्री. गुंजाळे यांना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले असता, पंच क्रमांक 2 श्री. गुंजाळे यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/गुर्सिंगे यांनी सदरच्या नोटा पंच क्रमांक 2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. पोनि/गुर्सिंगे यांनी काळया कपडयाच्या सहाय्याने अंधार करून श्री. ढाले यांचे दोन्ही हात व पँटचा मागील डावेबाजुचा खिसा, लाच रक्कम यावर अल्ट्राव्हायलेट प्रकाश टाकून तपासणी केली असता त्यावर हिरवट चकाकी दिसून आली. पोनि/गुर्सिंगे यांनी श्री. ढाले यांना माझे कामासंदर्भातील कागदपत्राबाबत विचारणा केली असता, त्यांनी मी दिलेला अर्ज व रजिस्ट्री असे त्यांच्या कार्यालयातुन काढुन दिले. त्यानंतर पोनि/गुर्सिंगे यांनी पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी, पोनि/गुर्सिंगे, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, दोन्ही आरोपी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे आलोत. त्याबाबत दिनांक 17/06/2025 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत सविस्तर पंचनामा केला आहे. त्यांनतर पोनि/गुर्सिंगे यांनी मला घडलेले घटनेची सर्व हकिगत सविस्तर सांगुन त्याप्रमाणे फिर्याद द्यावी असे सांगीतल्याने मी वरील प्रमाणे घडलेल्या घटनेबाबत पोनि/गुर्सिंगे यांचे समक्ष माझी फिर्याद कथन केली त्याप्रमाणे टंकलिखीत करण्यात आलेली आहे. वरिल फिर्याद शब्दसंख्या जास्त झाल्याने उर्वरित फिर्याद दुसऱ्या पानावर घेण्यात आली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

somanath dattatary jadhav(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in Charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Somanath dattatary
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI